राज्यातील बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या व सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या **सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा सुधारित कार्यक्रम..**

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२५/प्र.क्र. ०३ /का-८,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :-२३/०६/२०२६

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून) .

**विषय** - राज्यातील बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या व सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या,नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा सुधारित कार्यक्रम..

**संदर्भ** - १. ग्राम विकास विभागाचे क्र.ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.१३१/ई-१४०९६२३/पं.रा.-२, दि. १७/०२/२०२६ रोजीचे प्रभाग रचनेचे आदेश.

२. ग्राम विकास विभागाचे क्र.ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.१३/रा.२/दि. ०४/०५/२०२६ चे पत्र व त्यासोबतचे दिनांक ३०/०४/२०२६ चे शुध्दीपत्र.

३. ग्रामविकास विभागाचे क्र. ग्रापंनि-२०२५/प्र. क्र.१३१/पं.रा.२ / (ई-१४०९६२३) दि.०८/०५/२०२६ अंतीम प्रभाग रचना प्रसिध्द केल्याचा अहवाल.

४. राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र.०४/का.०८, दिनांक २५ /०५/२०२६ चे आदेश.

५. राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.०३/का.०८, दिनांक २६ /०५/२०२६ चे आरक्षण सोडत कार्यक्रमाचे आदेश.

६. जिल्हाधिकारी जळगाव यांचे क्र.ग्रामप/प्रभाग रचना/--/२०२६ दिनांक १७/०६/२०२६ चे पत्र.

७. जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे क्र.जि.प.पं.स./निवडणूक/कावि/--/२०२६ दिनांक १८/०६/२०२६ चे पत्र .

८. जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे क्र.साशा/कार्या-१२/टे-४/ग्रापनि/२०२६/२५३५ दिनांक १९/०६/२०२६ चे पत्र

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतींच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

राज्यातील बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या, सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी दिनांक २६/०५/२०२६ रोजी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम देण्यात आला आहे. या कार्यक्रमानुसार दिनांक १२/०६/२०२६ रोजी विशेष ग्रामसभा घेऊन दिनांक १७/०६/२०२६ रोजी प्रारुप अधिसुचनेस मान्यता देवून दिनांक १९/०६/२०२६ रोजी प्रारुप अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी जळगाव, अहिल्यानगर व चंद्रपूर यांनी अनुक्रमे संदर्भ क्र. ०६,०७ व ०८ च्या पत्रान्वये जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतींमध्ये चुकीच्या पध्दतीने आरक्षण काढण्यात आल्याचे व काही ग्रामपंचायती अनावधानाने आरक्षण कार्यक्रमातुन वगळण्यात आल्याचे कळविले आहे.

चुकीचे आरक्षण अथवा आरक्षण कार्यक्रमातून ग्रामपंचायती वगळण्याची स्थिती अन्य जिल्ह्यांमध्ये देखील झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

सबब, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १० अ(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून, ज्या ग्रामपंचायतीमध्ये चुकीच्या पध्दतीने जागा आरक्षित केल्यामुळे तसेच काही ग्रामपंचायती अनावधानाने आयोगाने दिनांक २६/०५/२०२६ रोजी दिलेल्या आरक्षण सोडत कार्यक्रमातून ज्या ग्रामपंचायती वगळण्यात आलेल्या आहेत, केवळ अशा ग्रामपंचायतींसाठी खालीलप्रमाणे नव्याने आरक्षण सोडतीचा कार्यक्रम राबविण्यासाठी आदेशित करण्यात येत आहे.

ज्या ग्रामपंचायतींची आयोगाने दिनांक २६/०५/२०२६ रोजी दिलेल्या आरक्षण सोडत कार्यक्रमानुसार दिनांक १९/०६/२०२६ रोजी प्रारुप अधिसूचना प्रसिध्द केली आहे, त्या ग्रामपंचायतींचा आरक्षण सोडतीचा कार्यक्रम दिनांक २६/०५/२०२६ च्या आदेशानुसार सुरु राहील.

## आदेश

१. ग्रामपंचायतींच्या सर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असल्याने, त्यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणेच सर्व काळजी व दक्षता घेऊन निवडणुका योग्यप्रकारे पार पाडाव्यात.

२. महाराष्ट्र अधिनियम क्र. १९/२०२२, दिनांक ०१/०२/२०२२ नुसार (बिगर/अंशतः अनुसूचित क्षेत्रामध्ये) नागरिकांच्या मागसवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, पंचायतींमधील निवडणुकीव्दारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील आणि एकूण आरक्षण (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग यांचे एकत्रित आरक्षण) पंचायतीमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.

३. **ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे) आदेश २०२६, दिनांक २५/०५/२०२६ मध्ये आरक्षणाची सविस्तर कार्यपध्दती नमूद केली असून या कार्यपध्दतीनुसार** आरक्षणाची सोडत काढण्याची प्रक्रिया राबविण्यात यावी. तसेच आयोगाने दिनांक २६/०५/२०२६ च्या आरक्षण कार्यक्रमातील सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** नुसार पार पाडण्यात यावा.

५. **संदर्भ क्रमांक ४ वरील दि.२५/०५/२०२६ च्या आदेशातील परिशिष्ट ८ नुसार ग्रामपंचायत आरक्षणाचे संपूर्ण विवरणपत्र तयार करण्यात यावे. परिशिष्ट १० नुसार आरक्षणाची प्रारुप अधिसुचना (नमूना ब) व परिशिष्ट १३ नुसार आरक्षणाची अंतिम अधिसुचना (नमूना अ) प्रसिध्द करण्यात यावी.**

६. संबंधित तहसिलदार यांनी या प्रारुप अधिसूचना व अनुसूची यास व्यापक प्रसिध्दी तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, मंडळ अधिकारी कार्यालय, तलाठी कार्यालय व ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर द्यावी.

७. विशेष ग्रामसभेत पार पाडलेल्या आरक्षण सोडतीअंती आरक्षणावर हरकती व सूचना तहसिल कार्यालयात कार्यालयीन वेळेत मागविण्यात याव्यात. तहसिलदार यांनी प्राप्त हरकती उपविभागीय अधिकारी यांना अभिप्रायासाठी सादर कराव्यात. उपविभागीय अधिकारी यांनी अभिप्राय देऊन जिल्हाधिकारी यांना **अंतिम** अधिसूचनेस मान्यता देण्यासाठी सादर कराव्यात व जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन **अंतिम** अधिसूचनेस मान्यता द्यावी.

८. अंतिम अधिसूचना व अनुसूची यास व्यापक प्रसिध्दी देण्याची जबाबदारी सबंधित तहसिलदार यांची असेल.

९. उक्त सर्व आदेशातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार तसेच इतर संबंधितांनी घ्यावी. उक्त कार्यक्रमानुसार प्रत्येक टप्प्यावरील अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करावा.

१०. सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** नुसार आरक्षणाचा कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

११. ज्या ग्रामपंचायतींची आयोगाने दिनांक २६/०५/२०२६ रोजी दिलेल्या आरक्षण सोडत कार्यक्रमानुसार दिनांक १९/०६/२०२६ रोजी प्रारुप अधिसूचना प्रसिध्द केली आहे, त्या ग्रामपंचायतींचा आरक्षण सोडतीचा कार्यक्रम दिनांक २६/०५/२०२६ च्या आदेशानुसार सुरु राहील, याची देखील दक्षता घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला

23.06.2026

( सुरेश काकाणी )

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र - परिशिष्ट अ

**प्रती** - १. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन.

**उक्त कालावधीतील ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसंदर्भात अनुदानाची पर्याप्त तरतूद (मागील अनुदानाच्या थकबाकीसह) करण्याबाबत आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी. तसेच या पत्रात निर्देश दिल्यानुसार ग्रामसेवकासह संबंधित गटविकास अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.) जिल्हा परिषद यांची सक्रिय भूमिका व जबाबदारी राहील, याबाबतचे निर्देश देणारे पत्र आपणाकडून तातडीने निर्गमित करण्यात यावे.**

२.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

३.विभागीय आयुक्त (सर्व),

**४.जिल्हाधिकारी सर्व (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)**

**५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)**

६.माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

७.सर्व निवडणूक कार्यासने

८.निवड नस्ती.

परिशिष्ट अ

## निवडणुकीस पात्र असलेल्या, बिगर व अंशत: अनुसूचित ग्रामपंचायतीतील सदस्यांच्या

## आरक्षण सोडतीचा सुधारीत कार्यक्रम

( ज्या ग्रामपंचायतींमध्ये चुकीच्या पध्दतीने जागा आरक्षित केल्यामुळे तसेच काही ग्रामपंचायती अनावधानाने आयोगाने दिनांक २६/०५/२०२६ रोजी दिलेल्या आरक्षण सोडत कार्यकमातून वगळण्यात आलेल्या आहेत, केवळ अशा ग्रामपंचायतींसाठी )

| सदस्यांची आरक्षणाची सोडत | कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|
| i) विशेष ग्रामसभेची सूचना देणे (आरक्षणाची सोडत काढण्याकरीता ) | २४/०६/२०२६ (बुधवार) |
| ii) विशेष ग्रामसभा बोलवून, तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली, आरक्षणाची सोडत काढणे ( अनु. जाती महिला, अनु.जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला) | २९/०६/२०२६ (सोमवार) |
| iii) प्रभागनिहाय आरक्षण प्रारुप अधिसूचनेला (नमुना ब) मा.जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे | ३०/०६/२०२६ (मंगळवार) |
| iv) प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करणे | ०१/०७/२०२६ (बुधवार) |
| v) प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | ०१/०७/२०२६ (बुधवार) ते ०७/०७/२०२६ (मंगळवार) |
| vi) उपविभागीय अधिकारी यांनी प्राप्त हरकती विचारात घेऊन अभिप्राय देणे | ०९/०७/२०२६ (गुरुवार) |
| vii) उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन अंतिम अधिसूचनेस (नमुना अ) मा. जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे | १३/०७/२०२६ (सोमवार) |
| viii) जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला (नमुना अ) व्यापक प्रसिध्दी देणे | १३/०७/२०२६ (सोमवार) |

२३.०६.२०२६

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र